ठाणे, बुधवार दि. १४ ऑगस्ट २०२४ वर्ष : १३, अंक : १०७ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे
संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

**लाडकी बहीण योजना वादाच्या भोवऱ्यात**

आमदार रवी राणा यांनी नुकतेच अमरावतीत एका कार्यक्रमात आक्षेपार्ह विधान केले आहे. त्यांच्या या विधानावर आरोप - प्रत्यारोप सुरू झाले आहेत. ......पान २ वर



जिल्हा परिषदेच्या पेसा क्षेत्रातील शाळांमध्ये शिक्षकांची कंत्राटी तत्वावर भरती

...पान ४ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३६° से | किमान २९° से

**बाजार**

सोने ७३,२८० | चांदी ९३,६८०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



काय हो जनाभाऊ,या खड्डयांच्या मागे अनेक अदृश्य शक्ती असल्याचा भास मला नेहमीच होतो !

# दिवाळीनंतर नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात विधानसभेची निवडणूक होण्याची चिन्हे

मुंबई: लोकसभा निवडणुकीत झालेल्या जोरदार राजकीय संघर्षानंतर संपूर्ण राज्याला आता विधानसभा निवडणुकीचे वेध लागले आहेत. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश मिळाले होते. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत मविआ (MVA) याच कामगिरीची पुनरावृत्ती करणार का, महायुती (Mahayuti) या धक्क्यातून सावरत पुन्हा कमबॅक करणार, याची जोरदार चर्चा सध्या सुरु आहे. मात्र, विधानसभा निवडणूक नक्की कधी होणार, मतदान आणि मतमोजणीची तारीख काय असणार, याबाबत निवडणूक आयोगाकडून अद्याप कोणतीही वाच्यता करण्यात आलेली नाही. मात्र, सूत्रांच्या माहितीनुसार विधानसभा निवडणूक (VidhanSabha Election 2024) ऑक्टोबर महिन्यात न होता नोव्हेंबर महिन्यातील दुसऱ्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. यंदा नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीलाच दिवाळी आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीचे मतदान आणि मतमोजणी दिवाळी संपल्यानंतरच पार पडेल, (पान २ वर)

**१४-१५ नोव्हेंबर दरम्यान निकालाची शक्यता**



## महायुतीला सरकारी निर्णयांच्या प्रचारासाठी जास्त अवधी मिळणार?

गेल्या काही दिवसांमध्ये महायुती सरकारने विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून अनेक लोकप्रिय योजनांची घोषणा सुरु केली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही त्यापैकी एक आहे. याशिवाय, आणखी काही सरकारी योजना सुरु करण्यात आल्या आहेत. या योजनांची अंमलबजावणी होऊन त्याचा लाभ नागरिकांना आता कुठे मिळायला सुरुवात होईल. त्यामुळे विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता सप्टेंबर महिन्यातच लागू झाली असती तर सरकारला या योजनांच्या प्रसिद्धीसाठी फारसा वेळ मिळाला नसता. याउलट ऑक्टोबर महिन्यात विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यास (पान २ वर)

# नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी पाच वर्ष



मुंबई : विधानसभा निवडणुकांच्या घोषणेपूर्वी कॅबिनेट बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जात असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत ८ मोठे निर्णय घेण्यात आले असून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा (ladki bain yojana) आढावादेखील घेण्यात आला आहे. तसेच, राज्यातील नगरपंचायत व नगरपालिकांमधील नगराध्यक्षांचा कालावधी आता २.५ ऐवजी ५ वर्षे करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे, पुढील काही दिवसांता नगराध्यक्षपदासाठी सोडत निघणार होती, त्यासाठी अनेक इच्छुक उमेदवार नगराध्यक्षदाची स्वप्ने रंगवत होती, त्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरलं गेलं आहे.

महाराष्ट्रात २२८ नगरपरिषदा व नगरपंचायती आहेत. त्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये निवडून आलेल्या नगरसेवकांच्या पाच वर्षांच्या कालावधीपैकी अडीच-अडीच वर्षांचे असे दोन अध्यक्ष निवडण्याचे निश्चित करून पहिल्या टप्प्याच्या नगराध्यक्षपदासाठी घेण्यात आलेल्या आरक्षणाच्या सोडतीचा कार्यकाळ संपुष्टात येत आहे. त्यामुळे, आता दुसऱ्या टर्ममधील नगराध्यक्षांची निवड काही दिवसांवर येऊन ठेपली असता नगराध्यक्षांचा कालावधी अडीच वर्षावरुन ५ वर्षांवर करण्यात आला आहे. त्यामुळे, नगराध्यक्षपदाची स्वप्ने पाहणाऱ्या नगरसेवकांची घोर निराशा झाली आहे.

राज्यात एकीकडे २ वर्षांपासून बहुतांश नगरपालिका, नगरपंचायत आणि महापालिकांमध्ये प्रशासन राज आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच न झाल्यामुळे येथील नगराध्यक्षदाची खुर्ची रिकामी असून तो पदभारही प्रशासनाकडे आहे. त्यातच आता राज्यातील उर्वरीत नगर पंचायतींमधील नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी ५ वर्षांचा करण्यात आला आहे. राज्यात अंदाजे १०५ नगर पंचायतच्या निवडणुका अडीच वर्षापूर्वी पार पडल्याने अडीच वर्षासाठी नगराध्यक्ष पदावर विराजमान झाले. मात्र, या नगराध्यक्षांचा कालावधी ऑगस्ट महिन्यात संपुष्टात येणार आहे. त्यामुळे नगराध्यक्ष पदाचे आरक्षण सोडत आतापर्यंत निघणे आवश्यक होते. आता, सरकारने अडीच वर्षांचा कालावधी आता थेट ५ वर्षांचा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी दिली आहे. त्यामुळे, अडीच वर्षानी नगराध्यक्षपदाचे स्वप्न पाहणाऱ्या उमेदवारांची मोठी निराशा झाली आहे.

### महाविकास आघाडीने घेतला होता निर्णय

राज्यातील नगरपालिकांच्या नगराध्यक्षांची निवड थेट जनतेतून करण्याचा निर्णय गत महायुती सरकारने घेतला होता. त्यानंतर, महाविकास आघाडी सरकारने हा निर्णय बदलून नगराध्यक्षांची निवड सभागृहातील नगरसेवकांकडून करण्याचा निर्णय घेण्यात आला. सध्या, तो निर्णय लागू असून अडीच वर्षांसाठी नगराध्यक्षपदाची निवड होती, ती आता ५ वर्षे करण्यात आली आहे. राज्यातील जवळपास १०५ नगरपालिकांमध्ये पुढील काही दिवसांत नगराध्यक्ष बदलले जाणार होते.



## मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले ८ महत्त्वाचे निर्णय...

मुंबई : राज्य मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत महायुती सरकारने काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे उपस्थित होते. येत्या काही महिन्यांत विधानसभा निवडणूक असल्याने आता होणारी मंत्रिमंडळाची प्रत्येक बैठक ही महत्त्वपूर्ण मानली जात आहे. त्यामुळे आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्य सरकार काय निर्णय घेणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या. राज्य मंत्रिमंडळाच्या आजच्या बैठकीत एकूण ८ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यामध्ये विदर्भ आणि मराठवाड्यातील दूध उत्पादकांसाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

१. विदर्भ व मराठवाड्यात दुग्ध विकासाला गती देणार १४९ कोटीस मान्यता देण्यात आली आहे.

२. मराठवाड्यातील खालसा झालेल्या वर्ग दोनच्या इनाम व देवस्थानच्या जमिनी वर्ग एक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे लाखो नागरिकांना याचा लाभ होणार आहे.

३. डेक्कन कॉलेज, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना सुरु करण्यात आली आहे.

४. यंत्रमागांना अतिरिक्त वीजदर सवलतीसाठी नोंदणीची अट मार्च २०२५ पर्यंत शिथील करण्यात आले आहेत.

५. तसेच शासकीय, खासगी वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवृत्त अध्यापकांना ठोक मानधन मंजूर करण्यात आले आहे.

६. सहा हजार किमी रस्त्यांचे डांबरीकरणाऐवजी सिमेंट काँक्रीटीकरण. सुधारित ३७ हजार कोटी खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

७. नगराध्यक्षांचा कालावधी अडीच ऐवजी पाच वर्ष करण्यात आला आहे.

८. सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कर्जासाठी केएफ डब्ल्यू कंपनीशी स्थिर व्याजदराने करार करण्यात आलेले आहेत.

## विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांना आता कॅबिनेट मंत्रिपदाचा दर्जा



मुंबई - महाराष्ट्राच्या विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांना आता कॅबिनेट मंत्रिपदाचा दर्जा देण्यात आला आहे. मुख्यमंत्री सचिवालयकडून राजशिष्टाचार विभागाने याबाबत प्रसिद्धीपत्रक जाहीर केलं आहे. नीलम गोऱ्हे यांना २ ऑगस्ट २०२४ च्या निर्णयानुसार कॅबिनेट मंत्रिपदाचा दर्जा देण्यात आला आहे. मुख्यमंत्र्यांच्या या निर्णयामुळे नीलम गोऱ्हे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहेत. दुसरीकडे शिंदे सरकारमध्ये नीलम गोऱ्हे या पहिल्या शिवसेनेच्या महिला कॅबिनेट मंत्री झाल्या असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

नीलम गोऱ्हे यांची मोठी राजकीय कारकीर्द राहिलेली आहे. नीलम गोऱ्हे या गेल्या ४० वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणात सक्रिय आहेत. नीलम गोऱ्हे यांनी सुरुवातीच्या काळात रिपब्लिकन पक्षासोबत काम केलं. त्यांनी एकेकाळी वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्यासोबतही काम केलं. यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातही काम केलं. राष्ट्रवादीत काही काळ काम केल्यानंतर नीलम गोऱ्हे यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

नीलम गोऱ्हे यांनी शिवसेनेत महिला सशक्तीकरणासाठी काम केलं. तसेच त्या २००२ पासून विधान परिषदेच्या सदस्य राहिल्या आहेत. त्यांनी शिवसेनेच्या माध्यमातून प्रचंड सामाजिक कार्य केलं. त्यामुळे पक्षाकडून त्यांची बढती होत गेली. राज्यात २०१४ मध्ये महायुतीचं सरकार आलं तेव्हा नीलम गोऱ्हे यांना (पान २ वर)

**थोडक्यात घडामोडी**

## बनावट म्हाडा संकेतस्थळावरून लोकांची फसवणूक

मुंबई - म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळाची हुबेहुब कॉपी करुन लोकांची फसवणूक केली जात आहे. Mhada.Org या बोगस संकेतस्थळावरुन चार नागरिकांची फसवणूक झाल्याचं समोर आलं आहे. म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळाशी साधर्म्य असलेल्या या बोगस संकेतस्थळात फोटो आणि रंगसंगती हुबेहुबे बवनण्यात आली आहे. त्यामुळे लोकांची फसवणूक होत आहे. या वेबसाईटवर सहा लाख रुपये भरा आणि २९ लाख रुपया घर मिळवा अशी जाहीरात करण्यात आली आहे. म्हाडाच्या आयटी विभागाने सायर सेलकडे यासंदर्भात तक्रार केली आहे. वास्तविक म्हाडाच्या अधिकृत वेबसाईटवर पैसे भरण्यासाठी कोणताही पर्याय देण्यात आलेला नाही. पण बनावट वेबसाईटवर पेमेंट ऑप्शन देण्यात आला आहे. लोकं या पेमेंट ऑप्शनवर क्लिक करुन पैसे भरत आहेत. (पान २ वर)

# ९० सीसीटीव्ही फुटेज तपासून फरार मोबाईल चोरट्याला बेड्या

ठाणे - ठाण्याच्या विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीत नागरिकांच्या हातातील मोबाईल दुचाकीवरून येऊन धूम स्टाईलने घेऊन पोबाऱ्या करणाऱ्या सराईत अट्टल मोबाईल चोरटा ९० सीसी टीव्हीच्या तपासणीनंतर ठाणे पोलिसांच्या जाळ्यात अडकला आणि मोबाईल चोरी ते विक्री ठाणे ते नेपाळ कनेक्शन समोर आले. चोरट्याकडून २४ महागडे मोबाइल,२ मोटारसायकल असा एकूण ५ लाख ४० हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. दरम्यान, ठाण्यात चोरलेले मोबाईल नेपाळमध्ये विक्री करत असल्याचे तपासात उघड झाले आहे.

ठाण्यातील नौपाडा,वागळे आणि घोडबंदर येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीत दुचाकीवरून मोबाईल खेचून जबरी चोरी केल्याच्या घटना वारंवार घडल्या. या प्रकरणी ठाणे पोलिसांनी तपास सुरु केल्यानंतर आरोपी फैज वाहीद शेख (२०) या आरोपीला अटक केली होती. मात्र, त्याचा साथीदार अझरूद्दीन मोमीन हा चार



**ठाण्यात चोरलेल्या मोबाईलचे नेपाळ कनेक्शन**

२४ मोबाइल, २ मोटारसायकलसह लाखोंचा मुद्देमाल हस्तगत

महिन्यापासून फरार होता. आरोपी सतत त्याचे ठिकाण बदलत होता. पोलिसांनी ९० सी सी टीव्ही फुटेज तपासुन मोमीनचा माग काढण्यात आला. अखेर १० ऑगस्ट रोजी मोमीन माजीवाडा येथे चोरीचे मोबाईल विकण्यासाठी आला असता पाठलाग करून पोलिसांनी त्याला पकडले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी मंगेश भांगे,सहायक पोलीस निरीक्षक दत्तात्रय लोंढे यांनी ही विशेष कामगिरी केली. काही दिवसापासून ठाण्यामध्ये दूध चाखीवरून भडगाव रिक्षात प्रवास करणाऱ्या प्रवासाच्या हातातील किमती मोबाईल दुचाकीवरून मागे बसलेल्या इसमाद्वारे खेचून धूम स्टाईल पोवाड करण्याची एक मालिकाच घडली आणि आता या चोरीच्या नव्या फंड्याचा देखील या कनेक्शन मधून काही निष्पन्न होतंय का याबाबत पोलिस आता कसुशीने सखोल तपास करीत आहे.

### नौपाड्यातील १० गुन्ह्याची कबुली

पोलीस कस्टडी दरम्यान आरोपी अझरूद्दीन मोमीन याने फैज शेख याच्या सोबतीने नौपाडा हद्दीत एकूण १० गुन्हे केल्याचे कबुली दिली. मोमीन हा चोरी केलेले मोबाईल फोन मुंबईमधील एका डिलर मार्फत मध्यप्रदेश व तेथून नेपाळ येथे पाठवत असल्याचे तपासात समोर आले आहे.





मनोरुग्णालयातील सफाई कामगारांना किमान वेतन अधिनियम नुसार अदा करा, जानेवारी २०१९ पासून किमान वेतनच्या फरकाची थकीत रक्कम व्याजासह अदा करा या अशा विविध मागण्यांसाठी श्रमिक जनता संघाच्या माध्यमातून ठाणे मनोरुग्णालयातील सफाई कामगारांनी १३ऑगस्ट पासून बेमुदत साखळी उपोषण करू केले आहे. (छाया, मनोज सिंह)

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त...





पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या पराक्रमाची साक्ष इतिहासात नोंद आहेच किंबहुना त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी दिलेले मौलिक योगदान आजच्या पिढीला ज्ञात व्हावे. यानिमित्त रांगोळीच्या माध्यमातून अहिल्यादेवीना केलेले अभिवादन हा स्तुत्य उपक्रम आहे. असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवीच्या वंशज (खापर पणती) ड. रुचिका शिंदे यांनी ठाण्यात केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती वर्षा निमित्त विविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. आज मंगळवार १३ ऑगस्ट रोजी अहिल्यादेवी होळकर यांची पुण्यतिथी आहे. त्यांना पुण्यस्मरण करण्यासाठी संस्कार भारती ठाणे महानगर समितीतर्फे ठाण्यातील कोरम मॉलमध्ये पोर्ट्रेट रांगोळी साकारण्यात आली आहे. अहिल्यादेवी होळकर यांच्या वंशज (खापर पणती) ड. रुचिका शिंदे यांच्या हस्ते या रांगोळीचे उदघाटन मंगळवारी सायंकाळी करण्यात आले. त्यावेळी रुचिका शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधला.कळवा येथील श्रुतिका कडू या युवतीने ही रांगोळी चितारली आहे. याप्रसंगी, संस्कार भारतीच्या ठाणे महानगर अध्यक्षा प्रा. किर्ती आगाशे, सीए संजीव ब्रम्हे, उपाध्यक्षा शमिका कुरंबटे, सचिव गौरी सोनक, टीजेएसबीचे माजी संचालक भालचंद्र दाते, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रसाद दातार, राजीव मेहेंदळे, संस्थेचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. (छाया - मनोज सिंह)

## उत्पन्न मिळवून देणारे पालिकेचेच कार्यालयच असुविधेच्या गर्तेत...

**मुंब्र्यातील कर वसुली कार्यालयाची दूरवस्था..**


दिवा - सर्वसामान्य करदात्यांना पायाभूत सुविधा देण्याचे काम स्थानिक स्वराज्य संस्थेचे असले तरी, ठाणे महापालिकेचेच कार्यालय या सुविधांसपासून वंचित असल्याचे समोर आले आहे. दिवा प्रभाग समितीच्या अंतर्गत त्यात असलेले मुंब्र्यातील कर वसुली कार्यालयाची दुरावस्था झाली आहे. या ठिकाणी पावसाचे पाणी थेट कार्यालयात येत असून पिण्याच्या पाण्याची सुविधा देखील या ठिकाणी नाही. याशिवाय कार्यालयाच्या बाहेर असलेले घाणीमुळे कर्मचारी आणि नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न देखील निर्माण झाला आहे.

ठाणे महापालिकेचे आर्थिक बजेट हे साडेचार हजार कोटींच्या वर असून ठाणे शहरात सौंदरीकरणाची कामे मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहेत.मात्र मुंब्रा येथील पालिकेच्याच वसुली कार्यालयाच्या दुरावस्थेकडे बघायला प्रशासनाला वेळ नाही.



कार्यालयाच्या छतातून गळती ...

# संपादकीय...



संपादक-चंद्रकांत भोईटे

## लाडकी बहीण योजना वादाच्या भोवऱ्यात

आमदार रवी राणा यांनी नुकतेच अमरावतीत एका कार्यक्रमात आक्षेपार्ह विधान केले आहे. त्यांच्या या विधानावर आरोप – प्रत्यारोप सुरू झाले आहेत. आगामी विधानसभा निवडणुकीत मला मतरुपी आशीर्वाद न दिल्यास, लाडकी बहीण योजनेचे १५०० रुपये खात्यातून काढून घेईन, असे विधान आमदार रवी राणा यांनी केले आहे. त्यांच्या या विधानानंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. या विधानावर महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी संताप व्यक्त केल्यानंतर आता राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही रवी राणांवर नाराजी व्यक्त केली आहे. तसेच, अशा वक्तव्यांमुळे सरकारची बदनामी होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. अजित पवार यांनी रवी राणांच्या विधानाचा समाचार घेताना म्हटले आहे की, कोणत्यातरी लोकप्रतिनिधीने सांगितले की हे १५०० रुपये परत घेणार. मी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या साक्षीने सांगतो की हे पैसे परत घेण्याकरता नाहीत, तुमच्याकरता दिलेले आहेत. काहीजण कधीतरी वेगळ्या पद्धतीने वक्तव्य करतात, मग त्यातून पेपरबाजी केली जाते. बातम्या होतात. त्यातून नाहक महायुतीच्या सरकारची बदनामी होते. लाडकी बहीण योजनेचे पैसे परत घेऊ म्हणणाऱ्या रवी राणांचे नाव न घेता त्यांच्या वक्तव्यावर राज्याचे उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुनावले आहे की,अरे वेड्यांनो, निवडणुकीत मतरुपी आशीर्वाद न दिल्यास, लाडकी बहीण योजनेचे पैसे खात्यातून काढून घेईन असे म्हणता पण बहिणीला दिली गेलेली भाऊबीज परत घेता येत नाही. राणांच्या विधानावरून विरोधकांकडून त्यांच्यावर टीकेची झोड उठवली जात आहे. जळगावात लाडकी बहीण योजनेच्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. देवेंद्र फडणवीस यांनी या मुद्द्यावर रवी राणांना न बोलता विरोधकांना लक्ष्य केले आहे. ते म्हणाले, लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून आम्ही महिलांना १५०० रुपये देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे विरोधकांच्या पोटात दुखायला लागले आहे. कुणी म्हणते की महिलांना विकत घेता का? कुणी म्हणत आहे की, महिलांना लाच देत का? पण या नायालयकांना बहिणीचे प्रेम समजणार नाही. बहिणीच्या प्रेमाचे मोल त्यांना समजणार नाही. १५०० रुपयांत बहिणींचे प्रेम विकत घेता येत नाही, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली. आमदार रवी राणा यांनी काही दिवसांपूर्वी अमरावतीत लाडकी बहीण योजनेबाबत एक वादग्रस्त विधान केले होते. त्यांच्या या विधानानंतर मोठा वाद निर्माण झाला होता. रवी राणा म्हणाले होते की, सरकारने महिलांना प्रतिमहिना १५०० रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, दिवाळीनंतर ही रक्कम वाढवून तीन हजार रुपये केली पाहिजे. आज सरकारने तुम्हाला १५०० रुपये दिले आहेत. उद्या तुमचा भाऊ म्हणून मी ही रक्कम तीन हजार करण्याची विनंती सरकारकडे केली, तर तुम्हाला तीन हजार मिळू शकतात. पण ते तेव्हाच शक्य होईल, जेव्हा तुम्ही मला तुमचा भाऊ म्हणून मतरुपी आशीर्वाद द्याल. पण जर तुम्ही या निवडणुकीत मला आशीर्वाद दिला नाही, तर तुमचा भाऊ म्हणून मी तुमच्या खात्यातून लाडकी बहीण योजनेचे १५०० रुपये काढून घेईन. आमदार रवी राणा यांनी असे म्हणणे दुर्दैवी आहे. एक आमदार सरकारी योजनेचा गैरवापर निवडणुकीतील मतांसाठी करतो, असा मतितार्थ राणा यांच्या वक्तव्यातून निघतो. या विधानावरून ही योजना धोक्यात येऊ शकते.मंत्री आदिती तटकरे यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले आहे की, रवी राणांनी केलेले विधान दुर्दैवी आहे. कोणत्याही लोकप्रतिनिधींनी अशा प्रकारचे विधान करणे चुकीचे आहे. महायुतीच्या सरकारने ही जी योजना आणली आहे, ती गरीब महिलांच्या सन्मानासाठी आहे. त्या महिलांकडून पैसे परत घेण्याचा असा कोणताही विचार सरकार करत नाही. जास्तीत जास्त महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा, हा आमचा उद्देश आहे, त्यामुळे अशा प्रकारची विधाने करून गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न कोणीही करू नये, असा इशारा मंत्री आदिती तटकरे यांनी आमदार रवी राणा यांना दिला आहे.

# हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत पालिकेच्यावतीने तिरंगा यात्रेचे आयोजन

भिवंडी - केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या निर्देशाप्रमाणे शहरात ९ ऑगस्ट क्रांतीदिनापासून हर घर तिरंगा उपक्रमाला सुरूवात झाली आहे. या अंतर्गत वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार हर घर तिरंगा उपक्रम जनजागृती, प्रचार व प्रसार करण्याचा भाग म्हणून पालिकेच्यावतीने तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. पालिका आयुक्त अजय वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. पालिका आयुक्त अजय वैद्य यांनी सदर प्रसंगी तिरंगा प्रतिज्ञा घेऊन तिरंगा यात्रेला सुरुवात केली.

सदर तिरंगा यात्रेचा प्रारंभ भिवंडी नि.श. महानगरपालिका नविन प्रशासकीय इमारत येथून होऊन - स्व. आनंद दिघे चौक येथुन, डावीकडे वळुन पुढे हसिन सिनेमा थेटर (PVR) या शोरुम, येथुन डावीकडे वळून पुढे जुनी महानगरपालिका इमारत तेथुन डावीकडे वळून भिवंडी निजामपुर शहर महापालिकेची मुख्य प्रशासकीय इमारत (मुख्यालय), येथे सांगता झाली.

सदर कार्यक्रमात कामतघर मराठी माध्यमिक विद्यालय, चाविंद्रा मराठी माध्यमिक विद्यालय, नवी वस्ती मराठी माध्यमिक विद्यालय, टेमघर पाडा मराठी माध्यमिक विद्यालय, शांतीनगर उर्दू महाविद्यालय, निजामपूर उर्दू माध्यमिक विद्यालय, नवी वस्ती उर्दू माध्यमिक विद्यालय, अवचित पाडा उर्दू माध्यमिक विद्यालय, पद्म नगर तेलगु माध्यमिक विद्यालय, कामातघर तेलगु माध्यमिक विद्यालय, नारपोली हिंदी माध्यमिक विद्यालय, एन इ एस हायस्कूल भिवंडी, दादासाहेब दांडेकर विद्यालय, दी. स्कॉलर्स हायस्कूल व रंगराव विठोबा पवार विद्यालय या शाळांनी सदर कार्यक्रमात सहभाग घेतला. सदर कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय नेते यांच्या वेशभूषेत विद्यार्थी वर्ग सहभागी झाला होता. विद्यार्थी वर्गाने दानपट्टा व कराटे याचे प्रात्यक्षिक सादर केले. बँड पथक/लेझिम पथक यांचे सह विद्यार्थी वर्ग यात्रेत सहभागी झाले होते. भारत माता की जय, वंदे मातरम, हर घर तिरंगा या घोषणांने वातावरण राष्ट्रभक्तीमय निर्माण झाले.

या यात्रेत पालिका अतिरीक्त आयुक्त विठ्ठल डाके, उपायुक्त आरोग्य नयना ससाणे, समाज कल्याण विभागाच्या उपायुक्त डॉ. अनुराधा बाबर, उपायुक्त शिक्षण बाळाराम जाधव, माध्यमिक शिक्षण विभाग प्रमुख सुनील झळके,आरोग्य विभागाचे सहायक आयुक्त फैजल तातली, जे.एम.सोनावणे, जनसंपर्क अधिकारी मिलिंद पळसुले, क्रीडा अधिकारी शरद कलावंत,सर्व प्रभाग अधिकारी, क्रीडा शिक्षक, सर्व विभाग प्रमुख कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

# शिव जनरल कामगार सेनेच्या लढयाला यश

नवी मुंबई - नवी मुंबई महानगरपालिकेतील विविध मागण्या त्याच प्रमाणे करार व कंत्राटी कामगारांच्या मागण्याकडे पालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी शिव जनरल कामगार सेनेने १२ ऑगस्ट रोजी पालिका मुख्यालया समोर बेमुदत उपोषण सुरु केले होते. अध्यक्ष सुशील कारखानीस व सरचिटणीस घन:श्याम नाईक यांच्या माध्यमातून युनिट अध्यक्ष विजय पाटील यांच्या समवेत कामगार उपोषणात सहभागी झाले होते. विविध राजकीय नेत्यांनी हजेरी लावून उपोषणाला पाठिंबा दर्शविला होता. कामगार संघटनेच्या या शिष्ट मंडळा समवेत पालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी चर्चा करुन कामगारांच्या प्रश्नांना न्याय देऊ, असे आश्वासित केले. पालिका आयुक्ताच्या आश्वासनानंतर उपोषण मागे घेण्यात आले.




## मागण्यांची पूर्तता करण्याचे पालिका आयुक्तांचे आश्वासन

शिव जनरल कामगार सेनेचे युनिट अध्यक्ष विजय पाटील म्हणाले की, महापालिकेतील ४४ टक्के रिक्त पदे तात्काळ भरावी, २५ वर्षापेक्षा जास्त काळापासून कार्यरत करार (ठोक मानधन) व कंत्राटी कर्मचार्यांना पालिका सेवेत कायम करावे त्याचप्रमाणे सरळसेवेनुसार नवीन पदभरती झाल्यानंतर अर्हते शिवाय असलेल्या उर्वरीत करार व कंत्राटी कामगारांना पालिकेने सेवेतून कमी करू नये, पालिकेच्या शिक्षण विभागातील अंगणवाडी,बालवाडी सेविका, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आणि शिक्षकेत्तकर कर्मचार्यांना देण्यात येणारे वेतन लांबीवर टाकू नये,या मागण्यासाठी उपोषण करण्यात आले.यावर पालिका आयुक्त डॉ. शिंदे यांनी सकारात्मक भुमिका घेतली आहे. शिवसेना उपनेते विजय नाहटा यांनी आयुक्त डॉ.शिंदे आयुक्तां समवेत संघटनेच्या मागण्यांवर चर्चा घडवून आणली.

या उपोषण स्थळी शिवसेना उपनेते विजय नाहटा, राष्ट्रवादी युवकचे जिल्हाध्यक्ष अन्नु आंग्रे, शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे, रिपाईचे नेते सिद्राम ओहळ, विजय माने, अध्यक्ष स्वराज्य पक्षाचे उमेश जुनघरे, मारुती खुटवड (अध्यक्ष-संभाजी ब्रिगेड), डॉ.अमरदीप गरड (अध्यक्ष-सकल मराठा समाज) यांनी भेट देत पाठिंबा दर्शविला होता.

# राष्ट्रीय विचार प्रबोधिनीच्या पुढाकाराने मशाल पदयात्रेचे आयोजन



कल्याण - कल्याण पूर्व मधील राष्ट्रीय विचार प्रबोधिनी, ज्ञानेश्वर ग्रंथालयाच्या पुढाकाराने ९ ऑगस्ट रोजी क्रांती दिन तसेच जागतिक आदिवासी दिनानिमित्त भव्य मशाल पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पदयात्रेची सुरुवात ज्ञानेश्वर ग्रंथालयपासून झाली. आमदार पत्नी सुलभा गायकवाड, मॉडेल शाळेचे कैलास सुर्वे, मराठा समाजाचे तुकाराम सिलिमकर ह्यांच्याहस्ते मशाल प्रज्वलित करण्यात आली आणि पदयात्रेचा प्रारंभ झाला.

पदयात्रेत सहभागी विद्यार्थी व कार्यकर्ते हे देशप्रेमाच्या घोषणा देत पदयात्रा पूना लिंक रोडपासून ड प्रभाग क्षेत्राच्या जवळ असलेल्या क्रांतिकारक बीरसा मुंडा स्मारकाच्या ठिकाणी आली असता सर्वांनी क्रांतिकारक बीरसा मुंडा ह्यांचा जयघोष केला. मान्यवरांनी श्रध्दांजली वाहिली. सहभागी संस्था सहयोग सामाजिकचे विजय भोसले, जाणीव सामाजिक संस्थेचे प्रथमेश सावंत,अनिता पाटील, मंगला बापू ट्रस्टच्या अर्चना काठवळे-धुळप, स्त्री मुक्ती संस्थेच्या वर्षा कळके,कीर्तनकार नीलम व्यवहारे, जय जिजाऊ संस्थेचे राजेश मानवदे,सर्वात मका संस्थेचे संजय निरभवणे इ. अनेक संस्था, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला ह्यांचे आभार मानण्यात आले. राष्ट्रगीत झाल्यानंतर पदयात्रेचा समारोप करण्यात आला

## उत्पन्न मिळवून देणारे पालिकेचेच कार्यालयच असुविधेच्या गर्तेत...

**(पान १ वरून)** मुंब्र्यातील नारायण नगर येथील जोंधळे हायस्कूल बाजूला हे दिवा प्रभाग समितीच्या अंतर्गत येत असलेलेकर वसुली विभागाचे कार्यालय आहे. ज्या नागरिकांना दिव्यात जात येत नाही ते नागरिक या ठिकाणी कर भरण्यासाठी येत असतात. मात्र या कार्यालयात मोठ्या प्रमाणात असुविधा आहेत. या कार्यालयाची अक्षरशः दुरावस्था झाली असून सध्या पावसाळा सुरु असल्याने पावसाचे पाणी थेट कार्यालयात भरते. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात स्थानिक नागरिक कर भरण्यासाठी या कार्यालयात येत असल्याने नागरिकांची वर्दळ असते. याशिवाय लाडकी बहीण योजनेसाठीही नागरिकांची गर्दी होत असल्याने कार्यालयातील पाण्यात नागरिकांना उभे राहावे लागत आहे. विशेष करून ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना यामुळे प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

या कार्यालयाच्या मागील बाजूस लागूनच नाला आहे. नाल्यामधील दुर्गंधीमुळे कर्मचारी आणि नागरिकांना रोजच या दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे. नाल्यामध्ये साफसफाई न केल्यामुळे उंदीर, साप मोठ्या प्रमाणावर असल्याने जीवाचा धोका देखील निर्माण झाला असल्याचे इथे येणारे नागरिक सांगतात. या कार्यालयात साधी पिण्याच्या पाण्याची सुविधा देखील नाही.या ठिकाणी कर वसुली सोबत अन्य प्रशासकीय कामे देखील करण्यात येतात. मात्र ठाणे महापालिकेला उत्पन्न मिळवून देणाऱ्या या कार्यालयाला आणि कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना असुविधेचा सामना करावा लागत असल्याचे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

## दिवाळीनंतर नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात विधानसभेची निवडणूक होण्याची चिन्हं

**(पान १ वरून)** असे समजते. नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात दिवाळी संपल्यानंतर मतदानाची प्रक्रिया संपन्न होऊ शकते. त्यानंतर साधारण १४ किंवा १५ नोव्हेंबरच्या आसपास विधानसभा निवडणुकीचा निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्रात नियमानुसार नवी विधानसभा २६ नोव्हेंबर २०२४ रोजी अस्तित्त्वात येणार आहे. निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर साधारण ४५ दिवसांनी नवीन विधानसभेची स्थापना होणे अपेक्षित असते. त्यामुळे निवडणूक आयोगाने नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात विधानसभा निवडणूक घ्यायचे ठरवले तर त्यासाठी साधारण १२ ऑक्टोबरच्या आसपास सार्वत्रिक निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर केले जाईल. तेव्हापासून राज्यात लगेच आदर्श आचारसंहिता लागू होईल. त्यानंतर ४५ दिवसांचा कालावधी गृहित धरला तरी २६ नोव्हेंबरपूर्वी नव्या विधानसभेची स्थापना होणे शक्य आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यात २० सप्टेंबरच्या आसपास विधानसभा निवडणुकीचा आचारसंहिता लागेल, अशी चर्चा होती. तसे झाले असते तर विधानसभा निवडणुका दिवाळीपूर्वी म्हणजे ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात झाल्या असत्या. मात्र, राज्य निवडणूक आयोगाकडून तुर्तास तशी कोणतीही हालचाल दिसत नाही. सरकारी पातळीवरही कारभार हा नेहमीच्या गतीने सुरु आहे. अन्यथा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी नव्या प्रस्ताव आणि फाईलसच्या मंजुरीचा वेग कैकपटीने वाढतो. त्यामुळे या दिवसांमध्ये शासकीय पातळीवर अत्यंत वेगाने काम सुरु असते. त्यामुळे ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात विधानसभा निवडणूक होण्याची शक्यता कमी मानली जात आहे.

## महायुतीला सरकारी निर्णयांच्या प्रचारासाठी जास्त अवधी मिळणार?

**(पान १ वरून)** महायुती सरकारला योजनांच्या प्रचारासाठी किमान १५ जास्त दिवस मिळतील, अशी चर्चा आहे. याशिवाय, ऑक्टोबर महिन्यात विधानसभा निवडणूक झाल्यास आतापासूनच प्रचाराला सुरुवात करावी लागेल. राज्यातील पावसाचा हंगाम अद्याप पूर्णपणे संपलेला नाही. याशिवाय, श्रावण महिना आणि पुढील दिवाळीपर्यंतचे दिवस हे सणासुदीचे आहेत. त्यामुळे या काळात विधानसभा निवडणूक नको, असा काहीसा सूर राजकीय पक्षांमध्ये आहे. त्यामुळे आता राज्य निवडणूक आयोग काय निर्णय घेणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

## सभापती नीलम गोऱ्हे यांना आता कॅबिनेट मंत्रिपदाचा दर्जा

**(पान १ वरून)** मंत्रिपद किंवा राज्य मंत्रिपद मिळेल, अशी आशा होती. पण ते शक्य झालं नाही. यामुळे नीलम गोऱ्हे या नाराज झाल्याची चर्चा होती. पक्षाने नीलम गोऱ्हे यांना विधान परिषदेच्या उपसभापतीची धुरा सांभाळण्याची जबाबदारी सोपवली. यानंतर नीलम गोऱ्हे यांची पुन्हा विधान परिषदेच्या उपसभापती निवड झाली. शिवसेनेत दोन गट पडल्यानंतर नीलम गोऱ्हे या सुरुवातीला ठाकरे गटात होत्या. पण काही महिन्यांनी त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला. यानंतर आता शिंदे सरकारकडून त्यांना कॅबिनेट मंत्रिपदाचा दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे नीलम गोऱ्हे यांची या निमित्ताने मंत्रिपदाची इच्छा पूर्ण होणार आहे.

## बनावट म्हाडा संकेतस्थळावरून लोकांची फसवणूक

**(पान १ वरून)** बनावट वेबसाईटपासून सावध राहा असं आवाहन म्हाडाच्या आयटी विभागाने केलं आहे. म्हाडाने कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार आणि प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदाराने कोणाशीही व्यवहार करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. mhada.gov.in या अधिकृत संकेतस्थळावरच अर्ज नोंदणी, अर्ज भरणा आणि अनामत जमा प्रक्रिया सुरु आहे.


## नवी मुंबई महानगरपालिका

परिमंडळ-2 विभाग

निविदा सुचना क्र.-नमुंमपा/ कार्यकारी अभियंता(ऐरोली)/07/2024

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | (91305)ऐरोली विभागातील यादवनगर, चिंचपाडा, से-1, 1ए, 2, 3, 20 येथे कृत्रिम तलावासाठी पाणी पुरवठा व इतर अनुषंगिक कामे करणे. | 270000 |
| 2 | (91304) ऐरोली विभागातील से. 4 ते 18 येथे कृत्रिम तलावासाठी पाणी पुरवठा व इतर अनुषंगिक कामे करणे. | 270000 |
| 3 | (91289) ऐरोली नाका तलाव परिसरात गणपती विसर्जनासाठी बॅरीकेटींग करणे. | 194445 |
| 4 | (91291) ऐरोली से. 20 बी खाडी तलाव परिसरात गणपती विसर्जनासाठी बॅरीकेटींग करणे. | 189745 |
| 5 | (91290) ऐरोली दिवागाव तलाव परिसरात गणपती विसर्जनासाठी बॅरीकेटींग करणे. | 169190 |
| 6 | (91307) ऐरोली विभातील कृत्रिम तलाव परिसरात विविध ठिकाणी बॅरीकेटींग करणे. | 239940 |
| 7 | (91303) ऐरोली विभागातील यादवनगर, चिंचपाडा, से. 1, 1ए, 2, 3, 20 येथे कृत्रिम तलावावर टेबल, खुर्च्या इत्यादी आवश्यक फर्निचर पुरविणे. | 269856 |
| 8 | (91302) ऐरोली विभागातील से. 4 ते 18 येथे तलावावर टेबल, खुर्च्या इत्यादी आवश्यक फर्निचर पुरविणे. | 274671 |

**निविदा पुस्तिका दि. 14/08/2024 ते दि.21/08/2024 या कालावधीत दुपारी 1.00 वाजेपर्यंत मोहरबंद निविदा दि. 21/08/2024 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालय, आवक जावक कक्ष, तळ मजला प्लॅाट नं. 1 व 2, गोवर्धनी चौक, से.15 ए, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे ठेवण्यांत आलेल्या पेटीत टाकण्यांत याव्यात.**

**कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकरण्याचा अधिकार मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.**

सही/-
**(मदन ग. वाघचौडे)**
**कार्यकारी अभियंता (ऐरोली)**
**जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/204/2024 नवी मुंबई महानगरपालिका**

## नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम

बेलापूर भवन, ८ वा मजला, सेक्टर-११, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई- ४००६१४

**स्थापत्य विभाग**
**ई निविदा सुचना**

**निविदा सु. क्र.** नमुंमपा/परिवहन/का. अ. (स्था)/०६/२०२४-२५
**विषय : नमुंमपा परिवहन उपक्रमाच्या नेरूळ सेक्टर-३ येथील नेरूळ बस स्थानकाच्या अंतर्गत रस्त्यची सुधारणा करणे. अंदाजपत्रकीय रक्कम रू. २०,२३,७६१/- (+१८ %GST)**
सदर बाबतची सविस्तर माहिती संकेतस्थळ https://mahatenders.gov.in यावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार परिवहन व्यवस्थापक, नमुंमपा, परिवहन उपक्रम यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/-
(योगेश कडुसकर)
जा. क्र. नमुंमपा/परि/प्रशा/९०५/२०२४ **परिवहन व्यवस्थापक**
दि. १३.०८.२०२४ **नवी मुंबई महानगरपालिका परिवहन उपक्रम**

## पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

कार्यालय : २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. ०२२-२७४५२२३३ Email: panvelcorporation@gmail.com

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२४/प्र.क्र.३६१/३६२/२०२४ दिनांक :- १३/०८/२०२४

**ई निविदा प्रसिध्द करणेबाबत**

Request for Proposal for Sourcing of Cloud Hosting services from Meity emplaned Cloud Service Provider for Government Community Cloud या कामाची ई-निविदा पनवेल महानगरपालिका, पनवेल कडून मागविण्यात येत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील https://mahatenders.gov.in या वेबसाईट वर उपलब्ध आहे. संबंधित निविदाधारक यांनी त्याची नोंद घ्यावी.

पमपा/मातंवि/३४२३/प्र. क्र. ३/३५५/२०२३-२४
दिनांक : १३/०८/२०२४

सही/-
(कैलास गावडे)
उप आयुक्त
पनवेल महानगरपालिका

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे विभाग, ठाणे
वेस्ट व्हयू, तिसरा मजला,
राम मारुती रोड,
ठाणे (प.) ४००६०१.

**चौकशीची जाहीर नोटीस**

अर्ज क्रमांक :- ACC-II/६५१/२४
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक :- श्री बालाजी सेवा भावी संस्था एफ/४२०३६
अर्जदार :- श्री. अंकुशराव अशोकराव कंधारे
सर्व संबंधित लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मा. सहायक धर्मादाय आयुक्त - ३, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे विभाग, ठाणे हे वर नमूद केलेल्या फेरफार अर्जासंबंधी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० चे कलम २२ प्रमाणे चौकशी करणार आहेत. अर्जदार यांनी फेरफार अर्जामध्ये नमूद केले आहे, खालील विश्वस्तांना कार्यकारी मंडळातून / विश्वस्त मंडळातून कमी करण्यात आले आहे.
१) श्री. अंकुशराव अशोकराव कंधारे
२) श्री. दिगंबर मारोतराव बुरपल्ले
३) चंदा हणुमंत शिंदे
४) सुनिता संभाजी पानपट्टे
५) कांचन हानमंत शिंदे
६) सुशीला जिवनराव पानपट्टे
७) श्री. शंकर शिवाजी पिटलेवाड
तसेच खालील नमूद विश्वस्तांच्या कार्यकारी मंडळामध्ये / विश्वस्त मंडळामध्ये नवीन विश्वस्त समाविष्ट करण्यात आल आहे.
१) श्री. अंकुशराव अशोकराव कंधारे
२) श्री. दिगंबर मारोतराव बुरपल्ले
३) श्री. प्रज्योत दिगंबर भुरे
४) श्री. आदित्य अशोकराव कंधारे
५) शितल प्रज्योत भुरे
६) शुभांगी अंकुशराव कंधारे
७) श्री. शंकर शिवाजी पिटलेवाड
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी याची लेखी कैफियत, ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, ठाणे विभाग ठाणे यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०९/०८/२०२४ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक (न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
ठाणे विभाग, ठाणे.

BHIWANDI NIZAMPUR CITY MUNICIPAL CORPORATION
BHIWANDI (Dist. Thane)
MAHARASHTRA
OLD S.T. STAND. KAP-ALI,
BHIWANDI - 421 302, DIST. THANE

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी,
जि.ठाणे, महाराष्ट्र,
जुना एस.टी.स्टॅण्ड, कापआळी
भिवंडी - ४२१ ३०२, जि. ठाणे

TEL : 02522- 55314/55315, FAX : 02522-25074

जा.क्र. /ज.सं.वि/१०३३
दि. १९/०८/२०२४

**बांधकाम विभाग-प्र.स.क्र. ०३**
**प्रथम ई निविदा सुचना क्रमांक ४७/२०२४-२५**

भिवंडी निजामपूर शहर महापालिकेच्या बांधकाम विभाग मार्फत मनपा निधी अंतर्गत खालील नमुद कामाचे ई निविदा फॉर्म https://mahatenders.gov,in या संकेतस्थळावर विक्रीस उपलब्ध आहेत. अधिक महितीसाठी भि. नि. श. म. न. पा. नविन शासकीय इमारतीमधील ५ मजल्यावरील बांधकाम विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

**निविदा विक्री दि. १४/०८/२०२४ ते दि. २१/०८/२०२४**
**सादरीकरण दि. २१/०८/२०२४**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग समिती क्र. ०३ कार्यक्षेत्रातील मुख्य रत्याची मास्टिक पध्दतीने दुरुस्ती करणे | ३४,९७,३२४/- | ५००/-+ ९०/- |

सही/-
(सचिन नाईक)
प्र. शहर अभियंता
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

## भारतीय सैन्य दल

■ पदाचे नाव तपशील:
पद क्र. पदाचे नाव पद संख्या
१ हवालदार - २ नायब सुभेदार -

■ क्रीडा पात्रता: ॲथलेटिक्स, तिरंदाजी बास्केटबॉल बॉक्सिंग, डायव्हिंग, फुटबॉल, तलवारबाजी, जिम्नॅस्टिक्स, हॉकी, हँडबॉल, कबड्डी. ज्यांनी वर नमूद केलेल्या कोणत्याही खेळ आणि खेळांमध्ये खालीलप्रमाणे प्रतिनिधित्व केले आहे:- (E) व्यक्ती राष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करून कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर पदक विजेता असावी किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर (इंडल इव्हेंट) देशाचे प्रतिनिधित्व केले असेल. (ab) व्यक्तीने कनिष्ठ/वरिष्ठ स्तरावर (सांघिक स्पर्धा) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये राज्य किंवा देशाचे प्रतिनिधित्व केलेले असावे. (ac) वैयक्तिक खेळो इंडिया गेम्स आणि युथ गेम्समध्ये पदक विजेता असावा.

■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.१: १०वी उत्तीर्ण
पद क्र.२: १०वी उत्तीर्ण

■ वयाची अट: जन्म ०१ ऑक्टोबर १९९९ ते ३० सप्टेंबर २००६ दरम्यान झालेला असावा.

■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: Directorate of PT Sports General Staff Branch IHQ of MoD (Army) Room No 747 "A' Wing, Sena Bhawan PO New Delhi -110 011

■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३० सप्टेंबर २०२४

■ वेबसाईट https://www.indianarmy.nic.in/

## मध्य रेल्वे

■ जागा : २४२४

■ पदाचे नाव: अप्रेंटिस
मुंबई
भुसावळ
पुणे
नागपूर
सोलापूर

■ शैक्षणिक पात्रता: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये NCVT (Fitter/Welder / Carpenter/ Painter/Tailor/Electrician/ Mechanist / PASAA / Mechanical Diesel / Lab Assistant/Turner/ Electronics Mechanic/Sheet Metal Worker / Winder / MMTM/Tool Die Maker/Mechanical Motor Vehicle/IT Electronic System Maintenance)

■ वयाची अट: १५ जुलै २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

■ नोकरी ठिकाण: मध्य रेल्वे

■ Fee: General/OBC: 100/- SC/ST/PWD/EWS/महिला: फी नाही

■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १५ ऑगस्ट २०२४

■ अधिकृत वेबसाईट https://cr.indianrailways.gov.in/

## पश्चिम-मध्य रेल्वे

■ जागा : ३३१७ जागा

■ पदाचे नाव :
१ अप्रेंटिस (प्रशिक्षणार्थी)

■ शैक्षणिक पात्रता: मेडिकल लॅब टेक्निशियन: (i) १२वी उत्तीर्ण (Physics, Chemistry Biology) (ii) NCVT/SCVT. उर्वरित ट्रेड: (i) ५०% गुणांसह १०वी उत्तीर्ण (ii) संबंधित ट्रेड मध्ये ITI

■ वयाची अट: ०५ ऑगस्ट २०२४ रोजी १५ ते २४ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

■ नोकरी ठिकाण: पश्चिम-मध्य रेल्वे

■ Fee: General/OBC:141/- SC/ST/PWD/महिला: ४१/-

■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०४ सप्टेंबर २०२४

■ अधिकृत वेबसाईट https://wcr.indianrailways.gov.in/



## होमगार्ड भरती २०२४

■ जागा : ९०००
पदाचे नाव :
१ होमगार्ड

■ जिल्हानिहाय रिक्त पदे:
अ.क्र. जिल्हा पद संख्या
१ सातारा ४९५
२ नांदेड ३२५
३ रत्नागिरी ४५८
४ जळगाव ३२५
५ चंद्रपूर ८२
६ यवतमाळ १२१
७ सिंधुदुर्ग १७७
८ धुळे १३८
९ हिंगोली ७५
१० अमरावती १४१
११ बीड २३४
१२ धाराशिव २३७
१३ वाशिम ५९
१४ भंडारा ३१
१५ नंदुरबार ७९
१६ गडचिरोली १४१
१७ रायगड ३१३
१८ लातूर १४३
१९ पुणे १८००
२० सांगली ६३२
२१ नाशिक १३०
२२ कोल्हापूर २८७
२३ वर्धा ७६
२४ छ. संभाजीनगर ४६६
२५ नागपूर ८९२
२६ जालना १९५
२७ अकोला १५१
२८ अहमदनगर ३५९
२९ बुलढाणा २४८
३० बृहन्मुंबई -

■ शैक्षणिक पात्रता: किमान १०वी उत्तीर्ण

■ शारीरिक पात्रता:
उंची छाती धावणे
पुरुष १६२ से.मी. ७६ सेमी व फुगवून ५ सेमी जास्त १६०० मीटर
महिला १५० से.मी. - ८०० मीटर

■ वयाची अट: २० ते ५० वर्षे.

■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र

■ फी : फी नाही.

■ महत्त्वाच्या तारखा:
अ. क्र. जिल्हा Online अर्ज करण्याची शेवटची तारीख
१ सातारा ३१ जुलै २०२४
२ नांदेड १४ ऑगस्ट २०२४
३ रत्नागिरी १४ ऑगस्ट २०२४
४ जळगाव १४ ऑगस्ट २०२४
५ चंद्रपूर १० ऑगस्ट २०२४
६ यवतमाळ १७ ऑगस्ट २०२४
७ सिंधुदुर्ग १४ ऑगस्ट २०२४
८ धुळे १४ ऑगस्ट २०२४
९ हिंगोली १४ ऑगस्ट २०२४
१० अमरावती ०५ ऑगस्ट २०२४
११ बीड १६ ऑगस्ट २०२४
१२ धाराशिव १४ ऑगस्ट २०२४
१३ वाशिम १४ ऑगस्ट २०२४
१४ भंडारा १६ ऑगस्ट २०२४
१५ नंदुरबार १४ ऑगस्ट २०२४
१६ गडचिरोली १४ ऑगस्ट २०२४
१७ रायगड १६ ऑगस्ट २०२४
१८ लातूर १६ ऑगस्ट २०२४
१९ पुणे ११ ऑगस्ट २०२४
२० सांगली १४ ऑगस्ट २०२४
२१ नाशिक १४ ऑगस्ट २०२४
२२ कोल्हापूर १४ ऑगस्ट २०२४
२३ वर्धा १५ ऑगस्ट २०२४
२४ छ. संभाजीनगर १४ ऑगस्ट २०२४
२५ नागपूर २४ ऑगस्ट २०२४
२६ जालना १७ ऑगस्ट २०२४
२७ अकोला १७ ऑगस्ट २०२४
२८ अहमदनगर १७ ऑगस्ट २०२४
२९ बुलढाणा १७ ऑगस्ट २०२४
३० बृहन्मुंबई १४ ऑगस्ट २०२४

■ अधिकृत वेबसाईट https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php






## महाराष्ट्र राज्य नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग

■ जाहिरात क्र.: ०१/२०२४

■ जागा : २८९

■ पदाचे नाव :
१ रचना सहायक (गट ब)
२ उच्चश्रेणी लघुलेखक (गट ब)
३ निम्न श्रेणी लघुलेखक (गट ब)

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: स्थापत्य किंवा ग्रामीण आणि स्थापत्य/नागरी व ग्रामीण किंवा वास्तुशास्त्र किंवा बांधकाम तंत्रज्ञान डिप्लोमा
पद क्र.२: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १२० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.
पद क्र.३: (i) १०वी उत्तीर्ण उत्तीर्ण (ii) लघुलेखन १०० श.प्र.मि. (iii) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.

■ वयाची अट: २९ ऑगस्ट २०२४ रोजी १८ ते ३८ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट

■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र

■ फी : खुला प्रवर्ग: १०००/- मागासवर्गीय: ९००/-

■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४

■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.

■ अधिकृत वेबसाईट https://dtp.maharashtra.gov.in/

## भारतीय रेल्वे

### भारतीय रेल्वे

■ जागा : ७९५१

■ पदाचे नाव :
१ केमिकल सुपरवाइजर/रिसर्च
२ मेटलर्जिकल सुपरवाइजर/रिसर्च
३ ज्युनियर इंजिनिअर
४ डेपो मटेरियल सुपरिटेंडंट
५ केमिकल मेटलर्जिकल असिस्टंट

■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: केमिकल टेक्नोलॉजी पदवी.
पद क्र.२: मेटलर्जिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Electronics/ Civil/ Mechanical / Production / Automobile / Instrumentation and Control / Manufacturing / Mechatronics / Industrial / Machining / Tools and Machining / Tools and Die Making / Automobile / Information Technology / Communication Engineering / Computer Science and Engineering / Computer Science / Computer Engineering)
पद क्र.४: कोणत्याही विषयातील इंजिनिअरिंग डिप्लोमा.
पद क्र.५: ४५% गुणांसह B.Sc (Physics/Chemistry)

■ वयाची अट: ०१ जानेवारी २०२५ रोजी १८ ते ३६ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत

■ Fee: General/OBC/EWS: 500/- SC/ST/ExSM²/ट्रान्सजेंडर/EBC/महिला: २५०/-

■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २९ ऑगस्ट २०२४

■ अर्ज दुरुस्ती: ३० ऑगस्ट ते ०८ सप्टेंबर

■ वेबसाईट https://indianrailways.gov.in/

---

■ नैसर्गिक आपत्ती प्रतिबंधक १९५० कामांना मंजुरी ■ मंत्रालयातील राज्य आपत्कालिन प्रतिसाद केंद्र अद्ययावत करणार

# बचावकार्यासाठी अत्याधुनिक साधनसामुग्रीचा वापर करा : मुख्यमंत्री

मुंबई : नैसर्गिक आपत्ती रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना असणाऱ्या २,७६६ कोटी रुपयांच्या १९५० विविध कामांना आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या बैठकीत मंजुरी दिली. दरड प्रतिबंधक, वीज कोसळण्यापासून प्रतिबंध, पूर संरक्षण भिंत, लहान पुलांचे काम, नाला खोलीकरण दुष्काळ निवारणासाठी भूजल पुनर्भरण, तलाव दुरुस्ती, वनीकरण आदी कामांचा समावेश आहे. मंत्रालयातील राज्य आपत्कालिन प्रतिसाद केंद्र अद्ययावत करण्याचा देखील निर्णय यावेळी घेण्यात आला.
मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी आदी यावेळी उपस्थित होते.
नैसर्गिक आपत्ती रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांसाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य असल्याने ही आपत्ती प्रतिबंधक उपाययोजनेची कामे वेळेत आणि गुणवत्ता पूर्ण पद्धतीने करा. आपत्तीमध्ये बचावकार्यासाठी उपयुक्त ठरतील असे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर असलेली साधनसामुग्री घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले.
मंत्रालयातील राज्य आपत्कालिन प्रतिसाद केंद्राचे अद्ययावतीकरण करताना अत्याधुनिक साधन सामुग्रींचा वापर केला जाणार आहे. त्याचबरोबर प्रत्येक जिल्हाधिकारी यांना या केंद्राची कनेक्टीव्हीटी देखील दिली जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हा आपत्कालिन प्रतिसाद केंद्राचे देखील अद्ययावतीकरण करण्यात येणार असून त्यासाठी १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.
यावेळी राज्य भुस्खलन व्यवस्थापन आराखडा, ग्रामपंचायत आपत्ती व्यवस्थापन आराखडा, महाराष्ट्र राज्य उष्मलाट कृती आराखडा या आपत्ती विषयक आराखड्यांना तसेच पालघर-वसई भूमिगत विद्युत वाहिनीच्या कामाला मंजुरी देण्यात आली.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निधीतून पनवेलच्या ग्रामीण भागात विकासकामांचा शुभारंभ



पनवेल : पनवेल विधानसभा मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणारे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या ४९ लाख रुपयांच्या स्थानिक ग्रामविकास निधीतून ग्रामीण भागात करण्यात येणार्या विकासकामांचे भूमिपूजन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते सोमवारी झाले. ही कामे मार्गी लावल्याबद्दल या वेळी ग्रामस्थांनी आभार मानले.
आमदार प्रशांत ठाकूर यांच्या २५१५ या स्थानिक ग्रामविकास निधीतून १० लाख रुपये खर्चून वावंजे ग्रामपंचायत मधील कुंभारपाड्यातील अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण, वावंजे ते पालेखुर्द रस्त्याचे २० लाख रुपयांमधून रस्ता काँक्रीटीकरण, खानाव ग्रामपंचायतीमधील महालुंगी आदिवासीवाडीतील अंतर्गत रस्त्याचे ०९ लाख रुपये खर्चून काँक्रीटीकरण, तर खैरवाडीतील कोंडले येथे १० लाख रुपये खर्चून विसर्जन घाट बांधण्यात येणार आहे. या विकासकामांचे भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी आणि महिला मोर्चाच्या तालुका अध्यक्ष कमला देशेकर यांच्या हस्ते भूमिपूजन झाले.
दरम्यान, भाजप युवा मोर्चाच्या पनवेल ग्रामीण मंडळ अंतर्गत नियुक्ता जाहीर झाल्या असून यात तालुका चिटणीसपदी सचिन पाटील, तर वावंजे पंचायत समिती अध्यक्षपदी निलेश दाढावकर यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. त्याबद्दल भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी या वेळी सचिन पाटील आणि निलेश दाढावकरचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## रायगड जिल्ह्यात प्रथमच १११११ फुट तिरंगा पदयात्रा

### खारघरमध्ये भव्य दिव्य तिरंगा पदयात्रेचे आयोजन

पनवेल : भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीच्यावतीने खारघरमध्ये ' भव्य दिव्य ११११ फुट तिरंगा पदयात्रा' आयोजित करण्यात आली आहे. विशेष म्हणजे रायगड जिल्ह्यात प्रथमच सर्वात मोठी हि तिरंगा पदयात्रा असणार आहे.



'विकसित भारत' वर लक्ष केंद्रित करून आपला भारत देश ७८ वा स्वातंत्र्यदिन साजरा करणार आहे. देशभरात १३ ते १५ ऑगस्ट या कालावधीत घरोघरी तिरंगा अभियान राबवले जात आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर स्वयं स्फूर्तीने राष्ट्रध्वज तिरंगा फडकवावा, यानिमित्ताने देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान आणि योगदान देणाऱ्या ज्ञात अज्ञात सर्व स्वातंत्र्यवीरांचे स्मरण व्हावे, या हेतूने सदर अभियान राबवले जात असून स्वातंत्र्य दिनानिमित्त १५ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता खारघर मधील सेक्टर १९ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल ते उत्सव चौक अशा मार्गाने या भव्य दिव्य तिरंगा यात्रेला प्रारंभ होणार आहे. या तिरंगा पदयात्रेत अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून अविस्मरणीय अनुभव आणि देशभक्तीच्या उत्सवात नागिरकांनी मोठया संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी केले आहे.

कोलकत्ता मधील डॉक्टर हत्येच्या निषेधार्थ कळवा छत्रपती शिवाजी रुग्णालयात

## मार्डचा कामबंद निषेध आंदोलन




कळवा : कोलकत्ता येथील कार वैद्यकीय महाविद्यालयात द्वितीय वर्षाचे पदवीत्तर वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीवर क्रूरपणे हल्ला करून तिच्यावर बलत्कार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली या भयवाय घटनेचा देशभर निषेध होत आहे. याचा निषेध म्हणून ठाणे महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयातील निवासी डॉक्टरांच्या मार्ड संघटनेने मंगळवारी मेणबत्ती हातात घेऊन काम बंद मुक निषेध आंदोलन केले यावेळी रुग्णालयातील निवासी डॉक्टरांनी सकाळी नऊ वाजल्यापासून बाह्य रुग्ण विभाग, वैकलपीत शस्त्रक्रिया, लॅबसेवा, वॉर्डड्युटी व शैक्षणिक क्रियाकल्प आदी सेवा बंद ठेवल्या होत्या फक्त रुग्णालयातील आपत्कालीन सेवा सुरू होत्या त्यामुळे या बंद सेवेचा नियमीत तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांचे हाल झाले.यावेळी निवासी डॉक्टरांनी घटनेचा निषेध घोषणा देऊन सरकारने प्रत्येक रुग्णालयात निवासी डॉक्टरांना दर्जेदार निवास,योग्य वाढीव सुरक्षा, पूर्णपणे सीसी टिव्ही,कॅमेरे ऑनकॉल रूमची सुविधा व कोलकत्ता येथील घटनेतील सर्व दोषी आरोपींना अटक करण्याची व महाविद्यालय प्रशासनावर कारवाई करण्याची मागणी केली.

### साडेचारशे डॉक्टरांचा लाँग मार्च

मंगळवारी सायंकाळी कळवा रुग्णालयातील निवासी डॉक्टर व ठाण्यातील इतर अश्या साडेचारशे डॉक्टर हातात मेनबत्ती घेऊन कळवा रूग्नालय ते कळवा नाका असा लाँग मार्च मोर्चा काढणार असल्याची माहिती कळवा रूग्णलय मार्ड अध्यक्ष डॉ. सचिन पाटील यांनी दिली.

*कोलकत्ता येथील निंदनीय घटनेचा निषेध करण्यासाठी मार्डचे सर्व डॉक्टर आम्ही एकत्र आलो आहोत. आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा व कोलकत्ता रूग्णालय प्रशासनावर कारवाई करण्यासाठी मार्डचे सर्व डॉक्टर आम्ही एकत्र आलो आहोत. आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा व कोलकत्ता रूग्णलय प्रशासनावर कारवाई होण्यासाठी आम्ही देशभर आंदोलन करणार आहोत.*
*-डॉ. सचिन पाटील,अध्यक्ष मार्ड संघटना छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय.*

## शाळांच्या वेळेतील बदल कागदावरच!

### तूर्त शाळा जुन्या वेळापत्रकाप्रमाणेच सुरू राहणार

नवी मुंबई : शाळांच्या वेळा बदलण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी नवी मुंबईतील शाळांमध्ये सोमवारपासून होणार होती. मात्र शिक्षक संघटनांच्या तीव्र विरोधामुळे हा वेळबदल कागदावरच राहिला. मात्र यामुळे पालक विद्यार्थ्यांमध्ये सोमवारी गोंधळाची स्थिती होती. दरम्यान, तूर्त शाळा जुन्या वेळापत्रकाप्रमाणेच सुरू राहणार आहेत. सोमवारी नेहमीच्या वेळेनुसारच शाळा भरवण्यात आल्या. शिक्षण संघटनांनी पालिकेच्या शिक्षण उपायुक्तांसमवेत बैठक घेत निर्णयाला विरोध केला. शिक्षक संघटनेचे रविंद्र फापाळे म्हणाले की या निर्णयाच्या अंमलबजावणीत अनेक त्रुटी आहेत. माध्यमिकच्या विद्यार्थ्यांना दुपारी तर शिशु वर्गांची शाळा ७ तास असे बदल आहेत. ते चुकीचे असल्याचे बैठकीत मांडण्यात आले. सध्या जुनेच वेळापत्रक ठेवण्याची मागणी केली आहे.

*शिक्षक संघटनांची सोमवारी बैठक घेण्यात आली. त्यांच्या मागण्या वरिष्ठांकडे पाठवण्यात येणार असून तूर्तास जुन्याच वेळापत्रकानुसार शाळा सुरू राहणार आहेत.*
*-अरुणा यादव, शिक्षणाधिकारी, नवी मुंबई महापालिका*

## स्टॉलधारकांचे रस्त्यावरच बस्तान, एपीएमसी धान्य बाजारात रस्त्यावर साहित्य विक्री

नवी मुंबई : वाशीतील एपीएमसी धान्य बाजारातील स्टॉलधारकांकडून रस्त्यावरच साहित्य विक्रीसाठी ठेवून रस्त्याची अडवणूक केली जात आहे. त्यामुळे या ठिकाणी ग्राहकांना चालताना मोठी कसरत करावी लागत आहे. काही स्टॉलधारकांनी अतिरिक्त जागेचा वापर करत रस्त्यावरही बस्तान मांडले आहे.
वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार आवारात एपीएमसी प्रशासनाने २० ते २५ वर्षांपूर्वी पाच बाजारातील पदपथांवर काही लहान व्यावसायिकांना व्यवसायासाठी स्टॉल वितरित केले आहेत. मात्र सध्या काही विनापरवाना स्टॉलदेखील उभारले आहेत. शिवाय काही स्टॉलधारक वितरित केलेल्या जागेपेक्षा अतिरिक्त जागेचा वापर करत असून विविध साहित्य ठेवून रस्ता अडवून बसले आहेत. रसवंतिगृहात रस्त्यावर टेबल-खुर्ची मांडून व्यवसाय सुरू आहे, तर खाद्यापदार्थ विक्रेते यांच्याकडून रस्त्यावरदेखील साहित्य मांडण्यात येत आहे. त्यामुळे आधीच हे स्टॉल पदपथावर वितरित केल्याने पादचाऱ्यांची वाट अडली आहे. आणखी त्यात भर म्हणजे या स्टॉलधारकांकडून रस्त्यावर साहित्य ठेवून रस्ता अडवला जात आहे. त्यामुळे बाजारात नागरिकांनी चालायचे कुठून, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे या ठिकाणी एपीएमसी प्रशासनाने योग्य ती कारवाई करून रस्ते अतिक्रमणमुक्त करावेत अशी मागणी होत आहे.

एपीएमसीत गेल्या कित्येक वर्षांपासून बाजारातील पदपथांवर काही स्टॉलधारकांना परवाने देऊन स्टॉलसाठी परवानगी देण्यात आली आहे. मात्र त्यात आता किती अधिकृत आहेत, किती विनापरवाना आहेत, याबाबत माहिती घेण्याची सूचना देण्यात आल्या आहेत.
-डॉ. पी. एल. खंडागळे, सचिव, एपीएमसी

## नवी मुंबईकरांना स्वच्छ, शुद्ध पाणीपुरवठा

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने पाणी तपासणीसाठी दोन आठवडे रविवारी विशेष पाणी गुणवत्ता तपासणीत २ हजार पाणी नमुन्यांची तपासणी करण्यात आली असून नवी मुंबईकरांना स्वच्छ, शुद्ध आणि सुरक्षित पाणीपुरवठा केला जात असल्याचे तपासणीतून स्पष्ट झाले आहे. ९५ नमुने उत्तम असल्याचे विशेष पाणी तपासणीत स्पष्ट झाले आहे.
पावसाळी कालावधी म्हणून तपासणीत वाढ करावी, असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी पाणीपुरवठा विभागास दिले होते. त्यास अनुसरून अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे व त्यांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी पाणी गुणवत्ता तपासणीची विशेष मोहीम रविवारी ४ व ११ ऑगस्ट रोजी राबविली. या दोन्ही वेळेस नेहमीपेक्षा दहा पट अधिक म्हणजे प्रत्येक रविवारी १ हजारांहून अधिक म्हणजे लागोपाठ दोन रविवारी २ हजारपेक्षा अधिक पाणी नमुने वेगवेगळ्या ठिकाणाहून तपासण्यात आले. महापालिका क्षेत्रातील घरे, सोसायट्या, गावठाण व झोपडपट्टी भाग, वाणिज्य संकुले, शैक्षणिक व इतर संस्था अशा विविध ठिकाणांहून तसेच मुख्य जलवाहिनी, भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्र, जलकुंभ अशा ठिकाणांवरूनही पाण्याचे नमुने घेऊन त्यांची तपासणी करण्यात आली.
या गुणवत्ता चाचणीमध्ये पिण्याच्या पाण्यातील विविध घटकांची चाचणी नवी मुंबई महानगरपालिकेच्या ८ ठिकाणी असलेल्या स्वत:च्या प्रयोगशाळांमध्ये करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या मध्यवर्ती प्रयोगशाळेत तसेच कोकण भवन येथील शासनाच्या प्रयोगशाळेमध्ये करण्यात येत आहे.

ठाणे महापालिकेच्या चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेत

# स्पर्धा परीक्षा पूर्व तयारी मार्गदर्शन वर्गासाठी प्रवेश सुरू

ठाणे (मेधा भोईटे) : ठाणे महानगरपालिका संचालित चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था ही केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) मार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांना नि:शुल्क मार्गदर्शन करणारी अग्रगण्य संस्था असून केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा पूर्व परीक्षेसाठी स्पर्धा परीक्षा पूर्व तयारी मार्गदर्शन वर्ग २०२४-२५ (Foundation Course) सुरू करण्यात येणार आहे. या वर्गासाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश घेवून स्पर्धा परीक्षांची तयारी करावी असे आवाहन ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

स्पर्धा परीक्षेत बसू इच्छिणाऱ्या आणि उच्च माध्यमिक परीक्षा व पदविका परीक्षा उत्तीर्ण होऊन पदवी अभ्यास क्रमाच्या पहिल्या (F.Y. Sci / F.Y.B.com / F.Y.B- / F.Y. Eng. Degree) अथवा दुसऱ्या (S.Y. Sci / S.Y.B.com / S.Y.B- / S.Y. Eng. Degree) या शैक्षणिक अभ्यासक्रमात शिकत असलेले तसेच उच्च माध्यमिक परीक्षेत विज्ञान, वाणिज्य, कला शाखेत व पदविका परीक्षेत (Diploma Course) उत्तीर्ण झालेले विद्यार्थी अर्ज करु शकतात.

सदर प्रवेश परीक्षेस इच्छुक विद्यार्थ्यांनी दिनांक ३०/०८/२०२४ पर्यत संस्थेच्या अधिकृत www.cdinstitute.net या संकेत स्थळावर उपलब्ध असलेल्या https://forms.epravesh.com/CDInstitute/ या लिंक मधील विहीत नमुन्यात अर्ज सादर करावा. टपालद्वारे, कुरिअरद्वारे, तसेच ई-मेल द्वारे प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत किंवा विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घेण्यात यावी. सदर प्रवेश परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेसंबंधी सर्व माहिती व सूचना संस्थेच्या नोटीस बोर्डावर तसेच ठाणे महानगरपालिकेच्या www.thanecity.gov.in व संस्थेच्या www.cdinstitute.net या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेली आहे.

सदर प्रवेश परीक्षेबाबत संस्थेमार्फत विशेष जनजागृती अभियान राबविण्यात आलेले असून, आतापर्यत ठाणे आणि मुंबईतील किर्ती, केळकर-वझे, रुईया, रुपारेल, चेतना, जोशी बेडेकर आणि बांदोडकर कॉलेज इत्यादी महाविद्यालयातील UPSC स्पर्धा परीक्षेकरिता इच्छूक असणारे एकूण ११०० विद्यार्थ्यांना संस्थेच्या प्रवेश परीक्षेबाबत माहिती व मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. याशिवाय दि.२८/०८/२४ रोजी पर्यंत ज्ञानसाधना, MCC, भवन्स्, एलफिस्टन, बिर्ला, NKT इत्यादी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन महाराष्ट्रात UPSC स्पर्धा परीक्षेबाबत जनजागृती अभियान राबविण्यात येणार असून दिनांक ३०/०८/२०२४ रोजी पर्यंत ठाणे, मुंबई आणि नवी मुंबईतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सदर प्रवेश परीक्षेकरिता नाव नोंदणी करावी, असे आवाहन संस्थेचे संचालक महादेव जगताप यांनी

## सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कर्जासाठी केएफ डब्ल्यू कंपनीशी स्थिर व्याजदराने करार

मुबई : राज्यातील ३९० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पांच्या कर्जासाठी केएफ डब्ल्यू कंपनीशी स्थिर व्याजदराने करार करण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

या प्रकल्पांच्या खर्चापोटी १५६४ कोटी २२ लाख ऐवजी १४९४ कोटी ४६ लाख किंमतीच्या खर्चास मान्यता देण्यात आली. केंद्र शासनाच्या सूचनांनुसार काऊंटरपार्ट फंडींग प्रकल्पाच्या कमीत कमी ३० टक्के असावे म्हणून सुधारित वित्तीय पॅटर्ननुसार कर्जाचे प्रमाण प्रकल्प खर्चाच्या ८५ टक्के ऐवजी ७० टक्के ठेवण्यास मान्यता देण्यात आली. केएफ डब्ल्यू कंपनीचे १३० दशलक्ष युरो इतके कर्ज ०.०५ टक्के व्याज दराऐवजी २.८४ टक्के प्रती वर्ष या स्थिर व्याजदराने कमाल १२ वर्षात परतफेड करण्यात येईल. हे प्रकल्प यवतमाळ, वाशिम तसेच चंद्रपूर जिल्ह्यात उभारण्यात येत आहेत.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान-उमेद जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत

## बँक लिंकेज संदर्भात एकदिवसीय कार्यशाळा संपन्न



ठाणे : आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीत जास्तीत जास्त पतपुरवठा (बँक कर्ज) उपलब्ध करून देणे, ऑनलाइन बँक लिंकेज करणे ही प्रक्रिया राबवण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्र, जिल्हा अग्रणी बँक, वागळे इस्टेट येथे सर्व बँक व्यवस्थापक व उमेद कर्मचारी यांची आज, दि. १२ ऑगस्ट २०२४ रोजी एक दिवशीय कार्यशाळा मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाने संपन्न झाली.

या कार्यशाळेची सुरुवात दिपप्रज्वलन व मान्यवरांचे स्वागत करून करण्यात आले. कार्यशाळेचे प्रास्तविक प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा सह जिल्हा अभियान संचालक एमएसआरएलएम, छायादेवी शिसोदे यांनी केले. तसेच राष्ट्रीय संसाधन प्रशिक्षक खान्डेराव दिक्षित यांनी कार्यशाळेचे प्रशिक्षण दिले. गटाचे बँक लिंकेज NRLM² MIS पोर्टलवर ऑनलाइन प्रक्रिया करणे व आर्थिक वर्ष २०२४-२५ या कालावधीतील आर्थिक व भौतिक लक्ष साध्य करण्यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. प्रशिक्षणादरम्यान उद्भवलेल्या शंकांचे निरस जिल्हा व्यवस्थापक - आर्थिक समावेशन प्रतिक्षा आगीवले यांनी केले.

यावेळी महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र ठाणे सोनाली देवरे, जिल्हा अग्रणी बँक, बँक ऑफ महाराष्ट्र व्यवस्थापक अभिषेक पवार, जिल्हा अभियान व्यवस्थापक सारिका भोसले, तसेच जिल्ह्यातील सर्व बँक व्यवस्थापक, सर्व MSRLM² चे अधिकारी, प्रभाग समन्वयक, माविम कर्मचारी व सर्व बँक सखी आदि प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. सदर प्रशिक्षणाचे नियोजन जिल्हा अभियान व्यवस्थापक सारिका भोसले व जिल्हा व्यवस्थापक- आर्थिक समावेशन प्रतिक्षा आगीवले यांनी केले. कार्यशाळेचा समारोप सारिका भोसले यांनी सर्वांचे आभार मानून केले.

# ठाण्याला नवे सायबर पोलीस ठाणे, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लवकरच उद्घाटन

**ठाणे (गणेश भोईटे) : गेल्याकाही वर्षांपासून ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात सायबर गुन्ह्यांची मोठ्याप्रमाणात वाढ झाली आहे. फसवणूक झाल्यानंतर नागरिकांनी तक्रारी कुठे करायच्या असा प्रश्न निर्माण होत असे. अनेकदा तक्रारदाराला पोलीस ठाण्यातून मुख्यालय, मुख्यालयातून पोलीस ठाणे अशा फेऱ्या मारायला लागत होत्या. या त्रासामुळे तक्रारदारही पुढे येत नसत. ठाणे आयुक्तायल क्षेत्रात नागरिककरण वाढल्याने येथे सायबर पोलीस ठाणे व्हावे अशी मागणी केली जात होती. अखेर पोलीस ठाणे बांधून तयार झाले आहे.**

ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या मुख्यालयाजवळ हे पोलीस ठाणे बांधण्यात आले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लवकरच या पोलीस ठाण्याच्या उद्घाटनाची शक्यता आहे. पोलीस ठाणे सुरू झाल्यास नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या नव्या पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यासह ३० ते ४० अधिकारी कर्मचारी असणार आहे. त्यांच्या नेमणूका करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

गेल्याकाही वर्षांमध्ये ठाणे जिल्ह्यात मोठ्याप्रमाणात नागरिकरण वाढले आहे. त्याप्रमाणे गुन्ह्यांची प्रकरणे देखील वाढली आहेत. ठाण्यात दररोज सायबर गुन्हे घडत आहेत. शेअर मार्केटच्या नावाने फसवणूक, मोबाईलवर एखादी लिंक पाठवून बँक खाते रिकामे करणे, ऑनलाईन 'टास्क' देऊन आर्थिक फसवणूक करणे अशा प्रकरणांची सर्वाधिक वाढ आहे. फसवणूक होणाऱ्यांमध्ये माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील तरुण-तरुणींचे प्रमाणही अधिक आहे. ठाणे पोलीस आयुक्तालय क्षेत्रात सायबर गुन्ह्यांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र असे पोलीस ठाणे नाही. ठाणे पोलीस मुख्यालयाच्या चौथ्या मजल्यावर सायबर कक्ष आहे. परंतु येथे गुन्हे दाखल होत नाही. नागरिक सायबर कक्षामध्ये आल्यानंतर त्यांना गुन्हा दाखल करण्यासाठी ज्या ठिकाणी गुन्हा घडला. तेथील पोलीस ठाणे गाठावे लागते. पोलीस ठाण्यामध्ये गेल्यानंतरही तेथे इतर तक्रारी देण्यासाठी अनेकजण आलेले असतात. त्यामुळे फसवणूक झालेल्या व्यक्तीला ताटकळत राहावे लागते. सायबर कक्ष आणि पोलीस ठाण्याच्या फेऱ्यामुळे अनेकदा फसवणूक झालेला व्यक्ती तक्रार देण्यासही टाळाटाळ करतो.

राज्यात काही ठराविक क्षेत्रातच सायबर पोलीस ठाणे आहेत. जिल्ह्यातील ठाणे शह पोलीस आयुक्तालय क्षेत्रात ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी शहराचा भाग येतो. आयुक्तालयाच्या लोकसंख्येनुसार येथेही सायबर पोलीस ठाणे उपलब्ध व्हावे अशी मागणी केली जात होती. काही महिन्यांपासून पोलीस मुख्यालयाच्या एका पडीक जागेत ठाणे शहर सायबर पोलीस ठाण्याच्या निर्माणाचे काम सुरू होते. या पोलीस ठाण्याचे बांधकाम आता जवळपास पुर्ण झाले असून रंगरंगोटीची कामे शिल्लक आहेत. लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या सायबर पोलीस ठाण्याचे उद्घाटन पूर्ण होणार आहे.

### पोलीस ठाणे निर्माण झाल्यास काय होईल ?

सायबर पोलीस ठाणे तयार झाल्यास नागरिकांना ऑनलाईन फसवणूकीच्या तक्रारी थेट या सायबर पोलीस ठाण्यात दाखल करता येणार आहे. पूर्वी स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल होत होते. या पोलीस ठाण्यांमध्ये अनेक गुन्ह्यांचा तपास सुरू असतो. त्यात सायबर गुन्हे दाखल होत असल्याने पोलिसांना देखील ताण येत असतो. त्यामुळे सायबर गुन्ह्यांचा शोध प्रलंबित असतो. आता सायबर पोलीस ठाणे निर्माण झाल्याने हे गुन्हे प्रलंबित राहण्याचे प्रमाण घटणार आहे. नव्या सायबर पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक दर्जाचा अधिकारी, त्याच्यासह इतर ३० ते ४० पोलीस अधिकारी आणि कर्मचारी असतील.

'अप्सरा' आईस्क्रीम ५३व्या वर्धापनदिनानिमित्त

## 'मुस्कान' उपक्रम




ठाणे, मुंबई येथील देशातील एक सुस्थापित आणि विश्वासप्राप्त ब्रँड असलेल्या अप्सरा आईस्क्रीमने कंपनीच्या ५३व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून आज एका नावीन्यपूर्ण उपक्रमाची घोषणा केली. लोकांच्या चेहऱ्यावर आनंद आणि स्मितहास्य आणण्यासाठी कंपनी ५३,००० मोफत आईस्क्रीमचे वितरण करणार आहे.'मुस्कान' हा उपक्रम ७८ व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून १५ ऑगस्टपासून मुंबई व पुण्यात सुरू होणार आहे. त्यानंतर अन्य शहरांमध्ये टप्प्याटप्याने तो सुरू करण्यात येणार आहे.

याप्रसंगी बोलताना अप्सरा आईस्क्रीमचे संस्थापक व भागीदार श्री. नेमचंद शहा म्हणाले, समाजाच्या विविध घटकांमध्ये आनंद पसरवणे तसेच आमचा ५३ वा वर्धापनदिन साजरा करणे हे 'मुस्कान'चे मुख्य लक्ष्य आहे. या उपक्रमाचा आरंभ १५ ऑगस्ट रोजी म्हणजे ७८ व्या स्वातंत्र्यदिनी होणार आहे. आमच्यासाठी ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. लोकांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य पाहून आणि त्यांचा दिवस संस्मरणीय करून आम्हाला अत्यंत आनंद होतो.

अप्सरा आईस्क्रीमचे व्यवस्थापकीय भागीदार केयूर शाह म्हणाले, समाजाच्या विविध घटकांपर्यंत पोहोचणे यावर या उपक्रमाचा संपूर्ण भर आहे. आम्ही आमचा वर्धापन दिन ७८ व्या स्वातंत्र्यदिनी साजरा करणार आहोत, ही आमच्यासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे.

## बेलापूर व तुर्भे विभागात अनधिकृत बांधकामावर धडक कारवाई

नवी मुंबई : नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामांविरोधात नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने तुर्भे व ऐरोली विभागात पाडकामाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अे विभाग बेलापूर कार्यालया अंतर्गत करावे गांव नवी मुंबई मालक- मंगेश यशवंत नाईक, विकासक- मधूर नाईक, यांनी नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता घर क्र-८४३, से-३६, करावे गाव, नवी मुंबई येथे अनधिकृतपणे बांधकाम सुरु केले होते. सदर मालक मंगेश यशवंत नाईक, विकासक- मधूर नाईक, घर क्र-८४३, से-३६, करावे गाव, नवी मुंबई येथील अनधिकृत बांधकाम शशिकांत तांडेल सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी - बेलापूर, यांचे नियंत्रणाखाली अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करुन करण्यात आलेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले. या धडक मोहिमेसाठी बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी शशिकांत तांडेल, मयुरेश पवार, कनिष्ठ अभियंता, तुर्भे विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी भरत धांडे, अमित पवार, कनिष्ठ अभियंता इत्यादी अधिकारी/कर्मचारी पोलिस बंदोबस्तासह उपस्थित होते. सदर कारवाईसाठी मजुर, हॅमर, गॅस कटर इत्यादी साहित्याचा वापरण्यात आले.



परदेशातील वैद्यकीय शिक्षणासाठी नवीन पनवेल येथील निष्ठा जितेंद्र वाघमारे या विद्यार्थिनीला लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून पाच लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. सदरचा धनादेश माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आज (दि. १३) निष्ठा वाघमारे हिला सुपूर्द केला.

## नवी मुंबई विमानतळ धावपट्टीची पुन्हा चाचणी सुरू

नवी मुंबई : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या पहिल्या टप्यातील धावपट्टी व इतर काम पुर्ण होण्याच्या वाटेवर असल्याने या विमानतळातून २०२५ मार्च अखेरीस मालवाहतूकीचे विमान वाहतूक सूरु करण्यासाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा. लिमीटेड (एनएमआयएएल) कंपनीने कंबर कसली आहे. विमानतळ सूरु करण्यापूर्वी या विमानतळातील धावपट्टीवरील उपकरण यंत्रांवरील वैमानिकांना मिळणारी माहितीची चाचणी सोमवारपासून भारतीय विमानतळ प्राधिकरणाने सूरु केली आहे. ही चाचणी होत असताना सोमवार ते बुधवार असे तीन दिवस विमानतळातील धावपट्टी क्रमांक २६/०८ च्या काही अंतरावरुन लहान विमानाचे उड्डाण करावे लागते. चाचणीसाठी विमान धावपट्टीलगत घिरट्या घालत असल्याने परिसरातील नागरीकांची घिरट्या घालणारे विमान पाहण्यासाठी उत्कंठा वाढत आहे.

पुढील सात महिन्यात नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन पहिले मालवाहू उड्डाण करण्यासाठी एनएमआयएएल कंपनीने कंबर कसली आहे. त्यासाठी सिडको मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल आणि सह व्यवस्थापकीय संचालक शान्तनू गोयल हे वेळोवेळी प्रकल्पाच्या कामाचा पाठपुरावा घेत आहेत. नवी मुंबई विमानतळावरील धावपट्टी व विविध तांत्रिक उपकरणांची चाचणीचे अनेक प्रयोग भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडून होणार आहेत.

## माथेरानला मुंबईच्या जवळ आणणार : आ. प्रशांत ठाकूर

निसर्गरम्य वातावरणामध्ये ट्रेक उत्साहात



पनवेल : माथेरानला मुंबईच्या जवळ आणण्यासाठी पनवेल हा मुख्य दुवा आहे. माथेरान हे पनवेलपासून हाकेच्या अंतरावर आहे. पर्यटकांना याचा फायदा होऊन लवकरात लवकर ते पनवेलहून माथेरानला कसे पोहचता येईल याकडे प्रामुख्याने लक्ष देणार आहे. यामुळे पनवेलमधील काही गावांचा पर्यटन विकाससुद्धा करता येईल, असे पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले आहे. ते ट्रेक करत रविवारी (दि. ११) माथेरानमध्ये आल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

भाजप युवा मोर्चाच्या माध्यमातून १८ वर्षाच्या युवकापासून ते ६९ वर्षाच्या ज्येष्ठ नागरिकांना पर्यावरण ट्रेकचा आनंद देत आमदार प्रशांत ठाकूर माथेरानमध्ये दाखल झाले. त्यांच्यासमवेत भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, चिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद ढवळे पदाधिकारी, कार्यकर्ते, निसर्ग मित्र संस्थेचे प्रतिनिधी होते. पनवेल तालुक्यातील धोदानी ते माथेरान हे डोंगराळ अंतर पार करत १५० लोकांचा चमू माथेरान येथील सनसेट पॉइंटवर दाखल झाला. माथेरानमध्ये भाजपचे शहराध्यक्ष प्रवीण सकपाळ, सरचिटणीस राजेश चौधरी, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, माजी नगरसेवक प्रदीप घावरे, चंद्रकांत जाधव आदींनी सर्वांचे स्वागत केले.

पनवेलपासून धोदानीपर्यंत पक्का रस्ता असून महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळाची एसटी सेवाही सुरू आहे. धोदानी गावापासून माथेरान हे साडेचार किलोमीटर असून हा रस्ता जर झाला, तर येथील काही गावांचा पर्यटन विकास होऊन आर्थिक प्रगती होईल याचा सारासार विचार करून पनवेल-माथेरान रस्ता तयार करण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न करणार असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी सांगितले. या रस्त्यामुळे पर्यटकांचा वेळ आणि इंधन वाचणार आहे तसेच याच मार्गावर फिनॅक्युलर रेल्वेचा प्रस्ताव आहे. याकडेसुद्धा लक्ष देणार असल्याचे ते म्हणाले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी सर्व सहकार्यांना सोबत घेऊन धोदानी ते माथेरान असा पर्यावरणपूरक ट्रेकिंगचा अनुभव घेतला तसेच माथेरानमध्ये सफर केली. सरतेशेवटी दुपारी याचमार्गे ट्रेक करत सर्वांनी परतीचा प्रवास केला.

जिल्हा परिषदेच्या पेसा क्षेत्रातील

## शाळांमध्ये शिक्षकांची कंत्राटी तत्वावर भरती

ठाणे : जिल्हा परिषद ठाणे, प्राथमिक शिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या कालावधीसाठी मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये पात्र उमेदवारांची उपशिक्षक, पदवीधर शिक्षक या पदावर एकत्रित मानधन तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी समक्ष अर्ज मागविण्यात आले आहे. याबाबत शिक्षण विभागाकडील पुर्वीची जाहिरात फक्त सेवानिवृत्त शिक्षकांसाठी होती परंतु शिक्षण विभाग प्राथमिक यांच्याकडील दि. १३ ऑगस्ट २०२४ मधील सुधारीत जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. ती जाहिरात जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

दि. १३ ऑगस्ट २०२४ मधील सुधारीत जाहिरातीत प्रस्तावित केल्यानुसार शैक्षणिक अर्हता व इतर बाबी दिलेल्या आहेत.

एकत्रित मानधनावर कंत्राटी पध्दतीने शिक्षक नेमणूका या पेसा क्षेत्रातील शाळांमध्ये नियमित शिक्षक भरती होईपर्यंत करण्यात येत आहेत. उमेदवाराचे नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष असणे आवश्यक आहे. मासिक मानधन रुपये २०,०००/- प्रतिमाह (इतर कोणतेही लाभाव्यतिरिक्त) दिले जाईल.

इच्छुक उमेदवारांनी अर्ज दि. १४ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट या कालावधीत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ठाणे जिल्हयातील आपल्या लगतच्या / सोयीच्या गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती अंबरनाथ, भिवंडी, कल्याण, मुरबाड व शहापूर या कार्यालयात जमा करावेत. तसेच अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

'घरोघरी तिरंगा अभियाना'त

## ठाणे पालिकेतर्फे 'तिरंगा मॅरेथॉन'चे आयोजन

सायकल आणि बाईकचीही तिरंगा रॅली होणार

ठाणे : स्वात्रंत्र्यदिनाच्या निमित्ताने देशभर सुरू असलेल्या घरोघरी तिरंगा या अभियानात ठाणे महानगरपालिकेतर्फे गुरूवार, १५ ऑगस्ट रोजी सकाळी ६.०० वाजता तिरंगा मॅरेथॉन, सायकल आणि बाईक यांची तिरंगा रॅली आयोजित करण्यात आली आहे. पाचपाखाडी येथील महापालिका मुख्यालयासमोरून या मॅरेथॉन आणि रॅलीला प्रारंभ होणार आहे.

१५ वर्षाखालील मुले आणि मुलींसाठी तीन किमीची मॅरेथॉन, १५ वर्षावरील मुले आणि मुलींसाठी पाच किमीची मॅरेथॉन होईल. मॅरेथॉन सकाळी सात वाजता सुरू होईल. सायकल आणि बायकर्स रॅली ही खुल्या गटासाठी आहे. त्यात ५ किमी आणि १० किमी असे दोन गट असतील. बायकर्स रॅली स. ६ वाजता तर सायकल रॅली स. ६.३० वाजता सुरू होईल, अशी माहिती क्रीडा उपायुक्त मिनल पालांडे यांनी दिली.



ठाणे जिल्हा अॅथलेटीक्स संघटना, महापालिकेचे सर्व विभाग, पोलीस आणि वाहतूक पोलीस, आम्ही सायकल प्रेमी, राईड फॉर कॉज अॅथलेटिक असोसिएशन, ठाण्यातील विविध हौशी सायकल संघटना आणि बायकर्स गट यांच्या सहकार्याने या तिरंगा मॅरेथॉन आणि तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात येत आहे.

**'नागरिकांनी घरोघरी तिरंगे फडकवावेत'**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील 'हर घर तिरंगा' अर्थात 'घरोघरी तिरंगा' या अभियानाचे यंदाचे तिसरे वर्ष आहे. त्यात ठाणेकरांनी उस्त्फूर्तपणे सहभागी व्हावे. आपल्याकडील राष्ट्रध्वज १३ ते १५ ऑगस्ट या काळात घर, दुकान, खाजगी आस्थापना यांच्यावर फडकवावा, असे आवाहन ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१